दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ४ थे अंक २९० वा शनिवार दि.१७ मे २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## मांजरी, सामनगाव जलसेतूजवळ कालवा फुटल्याने शेतीचे नुकसान; कालव्याची तात्काळ दुरूस्ती करावी माजी आमदार धिरज देशमुख यांची मागणी



लातूर :-- दि.१६ मे २०२५ रोजी पहाटे मांजरा प्रकल्प उजवा कालव्या मधील ६१ कि.मी.मध्ये मांजरी, सामनगाव जलसेतू जवळ कालवा फुटून शेतीचे नुकसान होवून पाण्याची नासाडी झाली आहे. उन्हाळ्याच्या दिवसात पाण्याचे महत्त्व खुप आहे. गावांसाठी व शेतीसाठी पाण्याची गरज लक्षात घेवून कालव्याची देखभाल,दुरूस्ती करणे व वेळो वेळी तांत्रिक बाबीवर लक्ष ठेवणे गरजेचे होते.मात्र संबंधित विभागाने ती काळजी घेतल्याचे दिसून येत नाही असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे मांजरी, सामनगाव जलसेतू जवळ फुटलेला हा कालवा तात्काळ दुरूस्त करावा व भविष्यात अशा घटना घडणार नाही याची काळजी घ्यावी असे माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे.

माजी आमदार तथा जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या सुचनेनुसार प्रत्यक्ष मांजरी, सामनगाव जलसेतू जवळ घटनास्थळी शिष्टमंडळाने भेट देवून पाहणी केली. या शिष्टमंडळात मांजरा कारखाना व्हा चेअरमन अशोकराव काळे, विलास कारखाना व्हा चेअरमन माजी आ.वैजनाथ शिंदे, माजी जिप सदस्य धनंजय देशमुख,मांजरा कारखाना संचालक कैलास पाटील,विलास कारखाना संचालक अनंत बारबोले,अंगद सुरवसे,किशोर गायकवाड, बिभीषण सुरवसे, अभिजीत बुलबुले, गजानन बुलबुले, रोहन झुंजारे, संजय होळकर आदींची उपस्थिती होती.

## पानगाव येथे ३ हजार मेट्रिक टन क्षमतेच्या नव्या गोदामांची उभारणी होणार - आ कराड

. लातूर :- लातूर जिल्ह्यात सोयाबीन आणि इतर शेतमालाच्या सुरक्षित साठवणुकीसाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फत 'सोयाबीन साठवणूक क्लस्टर' विकसित करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला असून याअंतर्गत रेणापूर तालुक्यातील पानगाव येथे ३ हजार मेट्रिक टन क्षमतेचे नवीन वखार केंद्र, आधुनिक गोदाम उभारण्यात येणार असल्याची माहिती लातूर ग्रामीणचे आ. श्री रमेशआप्पा कराड यांनी दिली.

लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सोयाबीनचे उत्पादन घेतले जाते गेल्या हंगामात नाफेडच्या किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत सोयाबीनची मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आली. दरम्यान पारंपरिक गोदामांच्या मर्यादित क्षमतेमुळे आधुनिक साठवण सुविधांची गरज लक्षात घेऊन वखार महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक कौस्तुभ दिवेगावकर यांनी शेतकरी हितासाठी सायलो आणि आधुनिक गोदामांच्या उभारणीचा प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पांमुळे शेतकऱ्यांना उत्तम दर मिळेपर्यंत माल साठवण्याची सुरक्षित व्यवस्था, गुणवत्ता संरक्षण, वखार पावती, आधारित कर्ज सुविधा आणि डिजिटल साठवण प्रणालीचा लाभ मिळेल असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाली की, लातूर एमआयडीसीतील सायलो प्रकल्प हा मुख्यमंत्री यांच्या १०० दिवस कृती आराखड्यात प्राधान्याने समाविष्ट आहे. सायलो बांधकामाची निविदा अंतिम टप्प्यात असून, राज्य शासनाच्या स्मार्ट योजनेंतर्गत निधी उपलब्ध होणार आहे. पानगाव येथील वखार केंद्रासाठी बाजार



समितीची जागा उपलब्ध झाली असून, निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. येत्या काही महिन्यांत हे प्रकल्प पूर्ण होऊन रेणापूर पानगाव भागातील शेतकऱ्यांसाठी अन्नधान्य साठवण हब म्हणून उदयास येईल, असा विश्वास व्यक्त करून सदरील प्रकल्पास मान्यता दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, पणन मंत्री जयकुमार रावल, जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि वखार महामंडळाचे अध्यक्ष कौस्तुभ दिवेगावकर यांचे जाहीर आभार लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांनी मानले आहेत.

## कडवई बौद्ध विकास मंडळ, स्थानिक व मुंबई आयोजित आशोक चक्र स्तंभ उद्घाटन सोहळा आ. शेखर निकम यांच्या उपस्थितीत संपन्न



संगमेश्वर/ प्रतिनीधी: संगमेश्वर तालुक्यातील कडवई बौद्ध विकास मंडळ, स्थानिक ग्रामस्थ व मुंबई येथील बौद्ध बांधवांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आशोक चक्र स्तंभ उद्घाटन सोहळ्याचा भव्य कार्यक्रम नुकताच आमदार शेखर निकम यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रसंगी आमदार शेखर निकम यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना बौद्ध संस्कृतीचा सामाजिक समतेच्या दृष्टीने असलेला महत्त्वाचा संदेश अधोरेखित केला. तसेच, स्तंभ उभारणीसाठी जागा देणाऱ्या अमिना जुवळे यांचे त्यांनी विशेष आभार मानले.

कार्यक्रमाला प्रज्ञानंद महाथेरो, राजेंद्र सुर्वे, दत्ता ओकटे, कडवई सरपंच सहदेव सुवरे, राहीन कडवईकर, राहील जुवळे, हरिश्चंद्र पवार, बाबूराव मोहिते, संदेश सागवेकर, संतोष गमरे, उदय मोहिते, अशोक गमरे, संजय कांबळे, सुनिल मोहिते, रवि कांबळे, सुगंधा मोहिते, रुमा कांबळे, महेंद्र कांबळे, राजू कांबळे, संदिप कांबळे, रतिश कांबळे, अभय कदम, संतोष कांबळे, शशिकांत कांबळे, शेखर कांबळे, वसंत कांबळे, सुरेश गमरे, शंकर कदम तसेच मुंबई व कडवई परिसरातील असंख्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बहरण्यासाठी परिस्थिती नाही तर मनस्थिती भक्कम असावी लागते,,!- समाजभूषण उत्तमराव तरकसे

पुणे :- काव्यमित्र संस्था पुणे यांच्या वतीने तारांगण ऑडिटोरियम पहिला मजला पिंपरी चिंचवड सायन पार्क येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती, जागतिक मातृदिन व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून पुस्तक प्रकाशन सोहळा व राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या धुमधडाक्यात साजरा करण्यात आला

सदर कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून समाजभूषण मा श्री उत्तमराव दासु तरकसे असरडोहकर (महाराष्ट्र शासनाच्या समाजभूषण पुरस्काराने सन्मानित प्रसिद्ध कवी साहित्यिक विचारवंत) प्रमुख अतिथी म्हणून श्रीमंत संभाजीराजे जाधवराव (मात्रतीर्थ सिंदखेडराजा राज्याचे लखोजी जाधवराव यांचे १४ वे वंशज तथा स्वराज्याचे सरसेनापती धनाजी जाधवराव यांचे थेट १० वे वंशज) मा डॉक्टर सुरेश वाकचौरे (कवी साहित्यिक ) डॉक्टर अशोक साळुंखे (प्रॉपर्ट श्रेयस रोल्स अँड ऑप्शन) भोसरी ) मा श्री सूर्यकांत शेटकार (लेखक) व सौ शारदा अभिजीत पवार (लेखिका )

सदर मान्यवरांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले व वेगवेगळ्या कार्याला वाहून घेऊन समाजाच्या प्रगतीकरिता साहित्य कला क्रीडा शैक्षणिक अशा विविध घटकात अतुलनीय कार्य करणाऱ्या मान्यवरास वेगवेगळ्या पुरस्कार ने सदर मान्यवरांच्या





हस्ते सन्मानित करण्यात आले सदर कार्यक्रमात उत्तमराव तरकसे यांनी विशेष अतिथी म्हणून आपले विचार मांडताना रखरखत्या उन्हात गुलमोहर जेव्हा एकटाच बहरतो.. तेव्हा त्याला बघून कळते की बहरण्यासाठी परिस्थिती नाही तर मनस्थिती भक्कम असावी लागते..!

असे प्रबोधनात्मक विचार मांडत काव्यमित्र संस्थेचे सर्व पदाधिकारी व संस्थेचे अध्यक्ष मा श्री सगर राजेंद्र यांनी कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून हजर राहण्याचे निमंत्रण देऊन कार्यक्रमात तुकाराम महाराजांच्या गाथेसह शाल श्रीफळ देऊन सन्मानित केल्याने आभार मानले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर सौ प्रतिमा कांबळे यांनी उत्तम प्रकारे सादरीकरण केले कार्यक्रमाच्या शेवटी श्री सगर रजेंद्र यांनी उपस्थित पाहुण्यांचे कवी साहित्यिक लेखक व रसिकांचे आभार मानत पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली




## हाँगकाँग ते सिंगापूरपर्यंत पुन्हा वाढली कोरोना रुग्णसंख्या, नव्या लाटेची चिंता

आशियातील हाँगकाँग आणि सिंगापूर या दोन प्रमुख शहरांमध्ये कोविड-१९ (उेँीळव-१९) च्या नव्या रुग्णसंख्येत लक्षणीय वाढ झाल्याने पुन्हा एकदा चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. हाँगकाँगमध्ये विषाणूचा प्रादुर्भाव गंभीर स्वरूपात असून, गेल्या वर्षभरातील सर्वाधिक गंभीर प्रकरणे आणि मृत्यू नोंदवले गेले आहेत. सिंगापूरमध्येही रुग्णसंख्येत २८ टक्क्यांनी वाढ झाली असून, आरोग्य यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.

हाँगकाँगमध्ये विषाणूचा तीव्र प्रादुर्भाव -

हाँगकाँगमधील आरोग्य सुरक्षा केंद्राच्या संचारी रोग शाखेचे प्रमुख अल्बर्ट औ यांनी स्थानिक प्रसारमाध्यमांना सांगितले की, कोविड-१९ साठी पॉझिटिव्ह रुग्णांचे प्रमाण गेल्या एका वर्षातील उच्चांकी पातळीवर पोहोचले आहे. केंद्राच्या आकडेवारीनुसार, ३ मे रोजी संपलेल्या आठवड्यात ३१ गंभीर प्रकरणे नोंदवली गेली, जी गेल्या वर्षभरातील सर्वाधिक आहेत. यामध्ये मृत्यूंसह गंभीर रुग्णसंख्येत चिंताजनक वाढ झाली आहे. हाँगकाँगच्या ७० लाखांहून अधिक लोकसंख्येपैकी अनेकांना या विषाणूमुळे रुग्णालयात दाखल करावे लागले आहे, तरीही ही रुग्णसंख्या मागील दोन वर्षांतील उच्चांकी पातळीच्या तुलनेत कमी आहे.

सिंगापूरमध्येही रुग्णसंख्येत वाढ -

सिंगापूर सध्या उच्च सतर्कतेवर आहे. सिंगापूरच्या आरोग्य मंत्रालयाने जवळपास एका वर्षानंतर रुग्णसंख्येवर पहिला अपडेट जारी केला आहे. ३ मे रोजी संपलेल्या आठवड्यात कोविड-१९ च्या अंदाजित रुग्णसंख्येत २८ टक्के वाढ होऊन ती १४,२०० पर्यंत पोहोचली, जी मागील आठवड्याच्या तुलनेत लक्षणीय आहे. यामुळे आरोग्य यंत्रणांनी सावध पवित्रा घेतला आहे.

# संपादकीय

## तहानलेला महाराष्ट्र, नियोजनाचे आव्हान

सर्वच प्रमुख जलस्रोतांच्या पाणीसाठ्यात कमालीची घट आणि तापमानातील असह्य वाढ यामुळे सारा महाराष्ट्र तहानला असून अनेक शहरे, खेडी आणि वाड्या-वस्त्यांवर टंचाईची स्थिती आहे. मान्सूनपूर्व पावसाने साथ दिली नाही तर ती गंभीर होण्याचा धोका संभवतो. राज्य सरकारला आणखी महिनाभर ही पाण्याची लढाई नेटाने लढावी लागणार, हे स्पष्ट आहे. गेल्या दीड महिन्यापासून उष्णतेच्या झळांनी महाराष्ट्र अक्षरशः होरपळतो आहे. विदर्भाने ४५ अंशांचा पारा कधीच ओलांडला होता. मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र त्यातून चुकला नाही. पुणे, कोल्हापूर, सांगलीची स्थिती फारशी वेगळी नव्हती. त्यातही पुणे आणि कोल्हापूरची तापमानवाढ चिंताजनक म्हणावी अशा पातळीवर पोहोचली होती. यंदा पुणे ४३, तर कोल्हापूर ४० अंश सेल्सिअसवर गेले. एरवी ऐन उन्हाळ्यातही आल्हाददायक असणारी ही शहरे उन्हाच्या तावाने अक्षरश: भाजून निघाली. विदर्भात उष्म्याने कहर केला. अकोला, यवतमाळ, गडचिरोली भागात उष्म्याचा तडाखा मोठा आहे. मराठवाड्यातील परभणी, मध्य महाराष्ट्रातील मालेगावला याचा फटका बसला. महाराष्ट्राची होणारी होरपळ ही हवामान बदलाच्या गंभीर परिणामांची छोटीशी झलक आहे. गेल्या चार दिवसांपासून पारा खाली आल्याने काहीसा दिलासा मिळाला इतकेच.

एकीकडे उन्हापासून होणारी लाही लाही आणि दुसरीकडे पाण्याची भीषण टंचाई गडद होताना दिसते. त्यातही पिण्याच्या पाण्याचे संकट मोठे. आटत चाललेले तलाव व तळी, तळ गाठलेल्या विहिरी, कोरड्या पडलेल्या कूपनलिका, नद्या आणि बंधारे हे चित्र आता टंचाईग्रस्त भागात जागोजागी आहे. कोल्हापूर, सांगली, सातार्यासह कोकणच्या काही भागाचा अपवाद, राज्यातील पाणीसाठा झपाट्याने खालावत आहे. यात नागपूर, अमरावती, पुणे, पिंपरी-चिंचवडसारख्या शहरांना पाणीपुरवठा करणारे स्रोत वेगाने आटत आहेत. विदर्भाची स्थिती चिंताजनक पातळीवर पोहोचली आहे. गतवर्षीच्या तुलनेत पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक आणि कोकण विभागाचा पाणीसाठा घटला. कोकणातील लघू प्रकल्पातील पाणीसाठा झपाट्याने कमी होतो आहे. गोसी खुर्द, खडकवासला, धामणे धरणातील साठा खालावला असून कोयना धरणाच्या साठ्यातही मोठी घट आहे. जायकवाडीचा साठा ३७ टक्क्यांखाली आलाय. पाऊसमान समाधानकारक असलेल्या पश्चिम महाराष्ट्रातील धरणांचा घटणारा पाणीसाठा ही धोक्याची घंटा मानावी लागेल. पिंपरी-चिंचवडसारख्या उद्योग नगरीत एक दिवसाआड, मनमाडला १३ दिवसांआड येणारे पाणी ही सरकारी नियोजनशून्यतेची लक्षणे. पावसाचा आणि पाण्याचा जिल्हा समजल्या जाणार्या सातार्यातही अनेक भागात विहिरींनी तळ गाठला. घागरभर पाण्यासाठी जीव धोक्यात घालून बाया-बापड्यांची अहोरात्र पायपीट सुरू आहे. आजघडीला राज्यात क्षमतेच्या केवळ ३७ टक्के साठा आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत तो दोन टक्क्यांनी कमी आहे, हे लक्षात घ्यावे लागेल. पाणीबाणी तयार होण्याआधीच त्यासाठीच्या उपयोजनांना गती देणे आवश्यक आहे. पिण्याच्या पाण्याची ही गंभीर स्थिती टोकावर पोहोचताना दिसते. त्यामुळे पशुधन, शेती आणि शेतकर्यांचे काय? तीव्र पाणीटंचाई निर्माण झालेल्या राज्यातील १८ जिल्ह्यांतील ६४४ गावे आणि दोन हजारांवर वाड्या-वस्त्यांना टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. तहानलेल्या मराठवाड्यात सर्वाधिक २७५ टँकर सुरू करण्यात आले. राज्यातील धरणांचा पाणीसाठा गतवर्षीच्या तुलनेत अवघा तीन टक्क्यांनी अधिक असला, तरी तेवढ्यावर समाधान मानायचे कारण नाही. पाऊस सक्रिय होण्यास अजून महिन्याचा अवधी आहे. याचा विचार करूनच शिल्लक पाण्याचे नियोजन होणे आवश्यक आहे. केवळ पाणीसाठ्याच्या सरकारी आकडेवारीवर विसंबून राहून कसे चालेल?


लोकसंख्येचा वाढता भार, नागरीकरणामुळे पाण्याचा वापर वाढला. पिण्यासाठी, कृषी आणि औद्योगिक वापरासाठी पाण्याचा उपसा मोठ्या प्रमाणात सुरू आहे. तहानलेल्या शिवारांची पाण्याची गरज या दिवसांत वाढली आहे. वाढती लोकसंख्या, प्रगत शहरांकडे धावणारे विस्थापितांचे लोंढे, त्याखाली कोंडलेली शहरे आणि कोलमडलेले शहर व्यवस्थापन हे चित्र नक्कीच काळजीत टाकणारे आहे. मुंबई-ठाण्याचा पाण्याचा प्रश्न मिटला की, सार्या महाराष्ट्राचा सुटला, असे मानायचे कारण नाही. पुण्यात अलीकडेच 'पुणे अर्बन डायलॉग : आव्हाने आणि उपाय' या विषयावरील चर्चेत भाग घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठ्या गतीने सुरू असलेले नागरीकरण आणि त्यासमोरील आव्हानांची रास्त चर्चा केली. शहरांचा चेहरा-मोहरा बदलण्याची आश्वासक कल्पनाही त्यांनी मांडली. मोठ्या गतीने वाढणार्या अफाट लोकसंख्येला उत्तम आणि सुसह्य होणारे जीवन देता येईल का आणि ते कसे, हा त्यांनी उपस्थित केलेला प्रश्न खूपच महत्त्वाचा. खुद्द मुख्यमंत्र्यांनीच तो चर्चेस आणल्याने सरकार दरबारी या प्रश्नाची दखल घेतली गेली, हे विशेष! महाराष्ट्राची ५० टक्के लोकसंख्या ५०० शहरांत आणि उर्वरित ५० टक्के राज्यातील ४० हजार गावांत राहते, हे कटू सत्य त्यांनी मांडले. पाणीटंचाईच्या प्रश्नामागील वस्तुस्थिती तपासून पाहिली, तर नक्कीच त्याचे मूळ या वास्तवात दडल्याचे दिसते. या पाचशेपैकी अनेक शहरे आणि ग्रामीण महाराष्ट्र आज पाण्यासाठी व्याकुळ आहे.

येणारा महिना अधिक चिंतेचा असणार यात शंका नाही. या स्थितीत राज्याचे प्रशासन टंचाईवर मात करण्याच्या कामामागे लावले जाईल, ही अपेक्षा! प्रशासकीय दिरंगाई हे कृत्रिम पाणीटंचाईमागील महत्त्वाचे कारण असते. त्यामुळे धरण उशाशी असलेल्या अनेक गावांनाही टंचाईला सामोरे जावे लागते. तहानलेल्या माणसाला आश्वस्त करणे महत्त्वाचे. ते करताना माणूस, पशुधन आणि शेती वाचवण्याला प्राधान्य हवे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी टंचाईग्रस्त गावांचा दौरा करून तातडीच्या उपाययोजना करण्याचे आदेश जिल्हाधिकार्यांना दिले असले, तरी प्रत्यक्ष कार्यवाहीचे काय? तीव्र टंचाईशी दोन हात करताना नियोजनाचा दुष्काळ पडणार नाही, याची खबरदारी राज्यकर्त्यांनी वेळीच घ्यावी. सरकारी तिजोरीत निधीचे वांदे कितीही असले आणि त्यावरून आरोप-प्रत्यारोपाला भरते आले असले, तरी पाणीटंचाईवरील उपाययोजनांवर खर्चासाठी हात आखडता घेऊन चालणार नाही. लाडक्या बहिणीइतकेच प्राधान्य पाण्याच्या प्रश्नालाही द्यायला हवे. जनतेची राजकीय करमणूक मुबलक होताना दिसते. सध्या राष्ट्रवादीच्या दोन पवारांचे गट विलीनीकरणाची चर्चा जोरात आहे. त्यामुळे राजकारणात नवे ढग दाटून आले आहेत. ते बरसणार की भाजपच्या नव्या वार्याने निष्क्रिय होणार हे लवकरच स्पष्ट होईल. मात्र, राज्यात सध्याची परिस्थिती पाणीबाणीची आहे, त्याकडे प्राधान्याने लक्ष कोण देणार?

# दहशतवाद पोसण्यासाठीच

भारत आणि पाकिस्तान संघर्ष शिगेला पोहोचला असतानाच पाकिस्तानला नवा मित्र मिळाला. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी म्हणजे आयएमएफ हे त्याचे नाव. गेल्या आठवड्यातच आयएमएफने पाकिस्तानला १ अब्ज डॉलरचे कर्ज दिले होते. आता पुन्हा पाकला १.०२ अब्ज डॉलर म्हणजे ८४०० कोटी रुपयांचा दुसरा हप्ता देण्यात आल्याची बातमी आहे. पाकिस्तानला दिल्या जाणार्या कर्जाच्या संदर्भात आयएमएफची बैठक झाली होती. त्यात भारताने हे कर्ज देण्यास विरोध केला होता. त्याचे कारण जगाला माहिती आहे.

तरीही मदतीसाठी आसुसलेल्या हातांनी नापाक इरादे असणार्या पाकला मदत करण्याचा निर्णय घेतला. हा पाकिस्तानातील जनतेप्रती असलेला कळवळा आहे की निर्णय घेण्याच्या प्रणालीवर कोणत्या शक्तींचा दबाव आहे? जे काही समोर दिसते आहे त्यावरून एक गोष्ट निश्चित आहे की कोणाच्या तरी आग्रहास्तव हा निर्णय घेतला गेला आहे. निर्णय घेणार्यांना पाकिस्तानची दहशतवाद पोसण्याची पॉलिसी मान्य आहे असे त्यातून स्वच्छ दिसते आहे. तसे जर असेल तर आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर विनाकारण मुठी आवळून जगाची पोलीसगिरी आता सगळ्यांनी बंद करणेच योग्य ठरेल. तथापि, तसे जर केले तर त्यांचे अंत:स्थ हेतू सफल होणार नाहीत हीच यातली मेख आहे.



भारतात पहलगाम येथे अत्यंत विकृत हल्ला झाला. पर्यटकांना मारणारे दहशतवादी पाकिस्तानच्या दिशेनेच पळाले. त्यांचा शोध लागला किंवा कसे हे अद्याप समोर यायचे आहे. भारताने यामुळे आपले निषेधाचे खलिते पाठवण्याचे धोरण बदलत कारवाई केली. ती पाकिस्तानच्या आत जाऊन केली. दोन्ही देशांमध्ये थेट संघर्ष सुरू झाला. पाकिस्तान जगभरात भिक्षापात्र घेऊन फिरत असतानाच आणि त्यांना भिक्षेची आत्यंतिक गरज असतानाच त्यांना आयएमएफकडून कर्ज मिळाले. संयुक्त राष्ट्रांप्रमाणेच येथेही कोणता निर्णय घेताना मतदान होते. मात्र 'नाही' म्हणायचा अधिकार नाही. तुम्हाला एकतर बाजूने मत द्यावे लागते अथवा मतदानापासून स्वत:ला बाजूला ठेवावे लागते. भारत अर्थातच मतदानापासून दूर राहिला.

प्रत्येक पावलावर जगाची मिन्नतवारी करण्यात आणि त्यांना वाईट गोष्ट कशी वाईट आहे हे सांगण्यातच आपली शक्ती खर्ची घालण्यात काही साध्य होत नसते. पाकिस्तान या पैशाचा उपयोग सीमेपलीकडून होणार्या दहशतवादाचे पोषण करण्यासाठीच करणार असल्याचे जगाला कळत नसावे इतके जग निर्बुद्ध नाही. तरीही गोष्टी घडत आहेत याचा अर्थ प्रत्येकाचे आपले भूराजकीय गणित वेगळे आहे आणि त्यानुरूपच ते चालत असतात. गेल्या तीन दशकांपासून किंवा त्या अगोदरही पाकिस्तानने आयएमएफ आणि अन्य जागतिक संस्थांकडून अब्जावधी डॉलरचे कर्ज घेतले आहे. तरीही पाकिस्तानचा ना चेहरा बदलला आहे ना चरित्र.

मिळणारी एवढी मोठी रक्कम नेमकी जाते कुठे याचाही थांगपत्ता त्या देशातील जाणकारांना लागत नाही. कारण, कोणतीही पारदर्शकता नाही. भारताविरुद्धच्या दहशतवादासाठी यातील काही भाग वळवला जातो हेही आता लपून राहिले नाही. भारतासोबत संघर्ष सुरू होण्याच्या अगोदरच पाकिस्तान मोठ्या आर्थिक संकटात होता. परकीय चलनसाठ्यात सातत्याने घट होतेच आहे, महागाईही प्रचंड वाढली आहे. मिळणार्या निधीमुळे पाकच्या अर्थव्यवस्थेला हातभार लागेल असा दावा केला जात असला तर तो खोटा आहे.

कारण, त्यांनी याच सुमारास भारताची कुरापत काढून पायावर कुर्हाड मारून घेतली. विविध संस्थांच्या अहवालांतील आकडेवारी सांगते की सप्टेंबर २०२४ मध्येच पाकिस्तानवर १३१.१ अब्ज डॉलर विदेशी कर्ज होते. हा आकडा कोणत्याही देशावर असलेल्या परकीय कर्जाचा उच्चांक आहे. यातून निर्माण झालेल्या संकटावर मात करण्यासाठी पाकिस्तानने अन्यत्र उधारी केली आहे. केवळ तीन महिन्यांच्या आयातीचा खर्च भागवू शकेल एवढाच परकीय चलनसाठा आज पाकिस्तानकडे आहे. कृषी क्षेत्रापासून सगळ्याच बाजूने त्यांची अर्थव्यवस्था कोलमडली आहे. विकासाचे किरण दूर दूरपर्यंत दृष्टीपथात नाही आणि अर्थव्यवस्था पूर्णत: ठप्प झाली आहे.

अशा दयनीय स्थितीत भारतासोबत त्यांनी अकारण संघर्ष केला. त्याहीपेक्षा विचित्र म्हणजे आयएमएफ पाकला मदत करण्यासाठी पुढे सरसावली. आपण हा पैसा देतो आहे किंवा यापूर्वी जो पैसा दिला तो नेमका कुठे खर्च झाला हे आयएमएफला जाणून घ्यावेसे वाटले नाही? पाकच्या संदर्भात जे काही चित्र जगासमोर वेळोवेळी येत असते त्यावरून एक बाब अधोरेखित होते की या देशाला ना आपल्या देशातील लोकांच्या गरिबीची चिंता आहे, ना त्यांच्या आरोग्याची आणि ना मुलांच्या शिक्षणाची. तसे जर नसते तर पाकिस्तानात गेल्या पाच-सात दशकांत मोठा बदल झालेला दिसला असता. अंतर्गत लाथाळ्या आणि लष्करापुढे लोटांगण ही यांची लोकशाहीची व्याख्या आहे.

कोणत्याही राजकीय पक्षाने देशाची दशा आणि दिशा बदलण्याचा प्रयत्न केला नाही. कारण तसे करणे लष्कराच्या विरोधात जाण्यासारखे. लोक शहाणे झाले की ते प्रश्न विचारतात हा सार्वत्रिक अनुभव आहे. तसे होऊ नये यासाठीच शिक्षणाच्या नावाने कथित धार्मिक संस्थांमधून केवळ भारतद्वेष शिकवला गेला आणि फुत्कार सोडणार्या पिढ्या निर्माण केल्या गेल्या. पहलगाम नंतर भारताने केलेल्या कारवाईत केवळ भारतद्वेषी मारले गेले नाहीत, तर अन्य देशांतील निष्पाप नागरिकांच्या रक्ताने ज्यांचे हात माखले आहेत तेही मारले गेले. त्याचे कारण दहशतवाद्यांचा आश्रयदाता आणि पोषणकर्ता पाकिस्तानच आहे. आयएमएफ अथवा अन्य संस्थांना याचे भान नसावे हे खरे वाटत नाही. मग त्यांनी हा दहशतवाद पोसण्यासाठीच पाकिस्तानला रतीब घालणे सुरू ठेवले आहे का?

---

# 'सीएसआर'ची खूशखबर!

सर्वसाधारणतः कंपन्यांची उलाढाल वाढली असून, त्यानुसार सीएसआर सक्तीची मर्यादा वाढवणे आवश्यक आहे. तसे केल्यास, ज्या छोट्या कंपन्या आहेत, त्यांना हा खर्च करावा लागणार नाही.

गेल्या काही वर्षांत सीएसआर किंवा 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी' ही संकल्पना विकसित झाली आहे. कंपन्यांनी देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय विकासात योगदान देणार्या उपक्रमांसाठी मदत करावी, हा त्यामागील हेतू आहे. व्यवसाय-उद्योगांनी नफा जरूर मिळवावा; परंतु समाजासाठी सकारात्मक कृतीही करावी, अशी अपेक्षा असते.




भारतात सीएसआर नियंत्रित करणारी कायदेशीर चौकट प्रामुख्याने कंपनी कायदा २०१३ मध्ये नमूद केली आहे. या कायद्याच्या अनुसूची सातमध्ये केलेल्या नियमानुसार, कंपन्यांनी मागच्या तीन वर्षांत आपल्या सरासरी निव्वळ नफ्याच्या किमान दोन टक्के सीएसआर उपक्रमांवर खर्च करणे आवश्यक आहे. तसेच ५०० कोटी रुपये किंवा त्याहून अधिक उलाढाल आणि पाच कोटी रुपये किंवा त्याहून अधिक निव्वळ नफा मिळवणार्या कंपन्यांनी, त्यांचे सीएसआर धोरण तयार करण्यासाठी आणि त्यावर देखरेख करण्यासाठी एक समिती नेमावी जेणेकरून निधीचा प्रभावीपणे वापर होईल, अशी अपेक्षा आहे.

भूक आणि गरिबीचे निर्मूलन, विशेष शिक्षण आणि रोजगार वाढवणार्या व्यावसायिक कौशल्यांसह शिक्षणाचा प्रचार, लिंगभाव समानतेला प्रोत्साहन देणे आणि महिलांना सक्षम बनवणे, पर्यावरणीय शाश्वतता निश्चित करणे तसेच किंवा केंद्र सरकारने सामाजिक आर्थिक विकासासाठी स्थापन केलेल्या कोणत्याही निधीत योगदान द्यावे, असे सीएसआरच्या नियमात म्हटले आहे. भारतात सीएसआर २०१४-१५ मध्ये १० हजार कोटी रुपयांवरून २०२०-२१ मध्ये २४ हजार कोटी रुपयांवर गेला होता.

मार्च २०२४ मध्ये संपलेल्या वर्षात सीएसआर फंडात १६ टक्क्यांची वाढ झाली असून, त्यामध्ये १७ हजार ९६७ कोटी रुपये जमले आहेत, ही गोष्ट अत्यंत स्वागतार्हच म्हणावी लागेल. यामध्ये बाजी मारली आहे, ती एचडीएफसी बँकेने. त्यांचा सीएसआर फंड होता ९४५ कोटी रुपये इतका. तर त्यानंतर रिलायन्स इंडस्ट्री- ९०० कोटी, टीसीएस- ८२७ कोटी आणि ओएनजीसी- ६३४ कोटी अशा रकमा खर्च झाल्या आहेत.

सीएसआर खर्चात इतकी वाढ कशामुळे झाली? त्याचे एक कारण म्हणजे, करोना संपल्यानंतर अर्थव्यवस्था आणि औद्योगिक क्षेत्र पुन्हा एकदा गतिमान होऊ लागले. कंपन्यांच्या नफ्यात १८ टक्के वाढ झाली असून, त्यामुळे खर्च करण्यासाठी त्यांच्याकडे रकमादेखील उपलब्ध होऊ लागल्या. एखादी कंपनी तोट्यात असेल किंवा तिचा नफा अत्यल्प असेल, तर ती सीएसआर फंडाचादेखील खर्च सुचवू शकत नाही. आता टाटा स्टील, आयसीआयसीआय बँक, आयएफसी, इन्फोसिस, आयटीसी, पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन अशा कंपन्यांनी सीएसआरमधून भरपूर खर्च केलेला दिसतो.

गेल्या तीन वर्षांतील १३९४ कंपन्यांचा निव्वळ नफा सरासरी ९ लाख कोटी रुपयांवर गेला आहे. २०२२-२३ च्या तुलनेत त्यात दीड लाख कोटी रुपयांची भर पडली आहे. एकूणच सर्वसाधारणतः कंपन्यांची उलाढाल वाढली असून, त्यानुसार सीएसआर सक्तीची मर्यादा वाढवणे आवश्यक आहे. तसे केल्यास, ज्या छोट्या कंपन्या आहेत, त्यांना हा खर्च करावा लागणार नाही. सीएसआरमधून सर्वाधिक, म्हणजे १,१०४ कोटी रुपये खर्च हा शिक्षणावर आणि ७२० कोटी रुपये आरोग्यसेवांसाठी खर्च करण्यात आला आहे.

भारतात शिक्षण आणि आरोग्याच्या सेवा-सुविधा वाढवण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने कंपन्यांचा हातभार लागत आहे, हे महत्त्वाचे. परंतु त्याचवेळी झोपडपट्टी विकास, आपत्ती व्यवस्थापन यावरील खर्च तुलनेने खूपच कमी आहे. आनंदाची बाब म्हणजे, शाश्वत पर्यावरण विकासाकरता सीएसआरमधून पूर्वीपेक्षा ५४ टक्के अधिक खर्च करण्यात आला आहे. ग्रामीण विकासासाठीदेखील फारशी मदत झालेली नाही. आणखीन एक बाब म्हणजे, काही कंपन्यांनी जेवढा खर्च करायचे बंधन आहे, त्यापेक्षाही अधिक खर्च केला आहे. तर २६९ कंपन्यांनी दोन टक्क्यांपेक्षा कमी खर्च केला आहे. तसेच दिलासा देणारी बाब म्हणजे, सार्वजनिक उपक्रमांच्या सीएसआर खर्चात १९ टक्क्यांची भरघोस वाढ झाली आहे.

ज्या काही मोठ्या व नावाजलेल्या कंपन्या आहेत, त्यांनी स्वतःचे एक चॅरिटेबल ट्रस्ट फाउंडेशन किंवा संस्था स्थापन केलेली आहे. त्या ट्रस्टमार्फत विविध समाजोपयोगी कामे केली जातात व त्यासाठी सीएसआर निधी वापरला जातो. उदाहरणार्थ, टाटा ट्रस्ट किंवा रिलायन्स फाउंडेशन इत्यादी. या संस्था इतर संस्थांसोबतसुद्धा काम करतात व त्यांना निधी उपलब्ध करून देतात आणि छोट्या-मोठ्या सामाजिक कार्य करणार्या संस्थांनादेखील सीएसआर निधी मिळवता येतो. पण त्यासाठी काही कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक असते.

तुमचे ट्रस्ट किंवा संस्था ही धर्मादाय आयुक्त कार्यालयात नोंदणी केलेली असावी किंवा कंपनी कायद्याखाली कलम ८ खाली नोंदलेली कंपनी असावी. तुमची संस्था ही आयकर कायद्याच्या कलम १२ ए खाली नोंद केलेली असावी. तुमच्या संस्थेला आयकराचे ८०जी सर्टिफिकेट प्राप्त असावे. तुमच्या संस्थेची नोंदणी ही निती आयोगाच्या वेबसाइटवर केलेली असावी. संस्था अगदीच नवीन नसावी, तिला कुठल्यातरी क्षेत्रात काम केल्याचा दोन-तीन वर्षांचा अनुभव असावा.

जर तुम्हाला भारताबाहेरील कंपनीकडून देणगी हवी असेल, तर तुमच्या संस्थेला एफआरएचे नोंदणी प्रमाणपत्र असावे. कंपनी कायद्याखाली सीएसआर वन फॉर्म मध्ये अर्ज करून नोंदणी केलेली असावी, हे नियम पाळले तर सीएसआर फंडाचा अनेक संस्थांना उत्तम उपयोग करून घेता येतो.

# विनापरवाना ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो-लाइट एयरक्राफ्ट,पॅराग्लायडर, पॅरामोटर्स, हॅण्ड ग्लायडर्स, हॉट एअर बलून इत्यादीच्या उड्डानावर बंदी -पोलीस अधीक्षक सोमय मुंडे

लातूर :– विनापरवाना ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो–लाइट एयरक्राफ्ट,पॅराग्लायडर, पॅरामोटर्स, हॅण्ड ग्लायडर्स, हॉट एअर बलून इत्यादीच्या उड्डानावर बंदी. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे आदेश निर्गमित.✻

सद्याच्या भारत पाकिस्तान युध्दजन्य परिस्थीतीमध्ये दहशतवादी/राष्ट्रविरोधी घटक ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो–लाइट एयरक्राफ्ट. पॅराग्लायडरचा वापर करून त्यांच्या हल्ल्यांमध्ये आणि त्याद्वारे व्हीव्हीआयपींना व लातूर जिल्ह्यातील मर्मस्थळांना लक्ष्य करू शकतात, मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक जीवन घोक्यात आणू शकतात. सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करू शकतात आणि लातूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था बिघडवू शकतात. त्यामुळे ड्रोन रिमोट कंट्रोल्ड मायक्रो–लाइट एयरक्राफ्ट, पॅराग्लाडरव्दारे संभाव्य घातपात रोखण्यासाठी लातूर जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आणि सक्रीय उपाययोजना करणे आवश्यक असल्याने सोमय मुंडे पोलीस अधीक्षक, लातूर तथा कार्यकारी दंडाधिकारी यांनी कलम १६३ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता. २०२३ अन्वये ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो–लाइट एयरक्राफ्ट. पॅराग्लायडर्स, पॅरा मोटर्स, हॅण्ड ग्लायडर्स, हॉट एअर बलून इत्यादी च्या उड्डाण क्रियांना लातूर जिल्ह्यातील कार्यक्षेत्रात दिनांक १७/०५/२०२५ ते दिनांक १५/०६/२०२५ पर्यंत पुढील ३० दिवसांसाठी प्रतिबंध करण्याचे आदेश लातूर पोलीसांकडून देण्यात आलेले आहे. यामध्ये हवाई पाळत ठेवणे किंवा पोलीस अधीक्षक, लातूर यांच्या लेखी विशिष्ट परवानगीने करण्यात येणारी कारवाई अपवाद राहील. सदरचा आदेश दि. १७/०५/२०२५ रोजी ००.०१ पासून दिनांक १५/०६/२०२५ रोजी २४.०० वाजेपर्यंत लागू असून या आदेशाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २२३ अन्वये दंडनीय असणार आहे.

सर्व संबंधितांना वैयक्तिकरित्या नोटीस बजावली जाऊ शकत नसल्यामुळे, याद्वारे एकतर्फी आदेश पारित करण्यात आले असून सदरचा आदेश लोकांच्या माहितीसाठी प्रसार माध्यमाद्वारे आणि सर्व पोलीस ठाणे, येथे नोटिस बोर्डवर प्रती चिकटवून प्रकाशित केला जाणार आहे.

सर्व संबंधितांनी नमूद आदेशाचे उल्लंघन करू नये, असे आवाहन लातूर पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या उपस्थितीत श्रामणेर शिबिराचा भव्य समारोप कार्यक्रम.

भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा लातूर. आयोजित श्रामणेर शिबिराचा भव्य समारोप

लातूर :– बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभा या बौद्धांच्या मातृसंस्थेच्या वतीने २४ प्रकारचे संस्कार शिबिरे घेण्यात येतात. त्याचाच एक भाग म्हणून बुद्ध गार्डन लातूर. येथे दिनांक ८ मे २०२५ ते १७ मे २०२५ या दरम्यान बौद्धाचार्य –श्रामणेर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये १०० श्रामणेर सहभागी झाले आहेत. सदरील शिबिराचा समारोप रविवार दिनांक १८ मे २०२५ रोजी सकाळी ७.०० वाजता बुद्ध गार्डन लातूर येथे होत असून, या कार्यक्रमास बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू व भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आद. डॉ. भीमराव साहेब आंबेडकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तसेच पूज्य भिक्खू महाविरो थेरो व पी धम्मानंद भन्ते यांची धम्मदेशना होणार आहे. या कार्यक्रमास ट्रस्टी व राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा समता सैनिक दलाचे स्टाफ ऑफिसर आद. ड. एस. के. भंडारे, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष यु. जी. बोराडे, महाराष्ट्र राज्य सरचिटणीस अशोक केदारे, यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तरी लातूर शहरातील व परिसरातील सर्व बौद्ध उपासक– उपासिकांनी पांढऱ्या शुभ्र वस्त्रांमध्ये या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन जिल्हाध्यक्ष आशाताई चिकटे, जिल्हा सरचिटणीस अभिमन्यू लामतुरे, जिल्हा कोषाध्यक्ष अर्जुन कांबळे, महिला जिल्हाध्यक्ष शारदाताई हजारे, महिला जिल्हा सरचिटणीस वंदनाताई कांबळे, महिला जिल्हा कोषाध्यक्ष मायाताई कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष संस्कार विभाग गौतम बनसोडे, जिल्हा उपाध्यक्ष संरक्षण विभाग मेजर जनरल राजाराम साबळे, जिल्हा उपाध्यक्ष प्रचार व पर्यटन विभाग राजेंद्र क्षीरसागर, जिल्हा सचिव संस्कार विभाग प्रेमनाथ कांबळे, जिल्हा सचिव संस्कार विभाग दत्तात्रय भोसले, तालुका अध्यक्ष अशोक कांबळे, महिला तालुकाध्यक्ष सुनीताताई भालेराव, शहराध्यक्ष बिभीषण माने व भारतीय बौद्ध महासभा लातूर (पश्चिम) जिल्हा, तालुका, शहर, महिला शाखा व समता सैनिक दल लातूर या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



# चिकन लव्हर्ससाठी खास; एकदा घरी नक्की बनवून पहा हॉटेल स्टाईल

अफगाणी चिकन टिक्का ही अफगाणिस्तानमधून आलेली एक लोकप्रिय आणि चवदार डिश आहे. ही डिश चिकनचे तुकडे मसाले आणि दही यांच्या मिश्रणात मॅरीनेट केले जातात आणि मग तंदूरमध्ये भाजले जाते. याची चव सिंपल पण तितकीच चवदार अशी आहे. तंदूरमध्ये भाजलेले हे क्रिमी चिकन चवीला अप्रतिम लागते. बऱ्याचदा ही रेसिपी तुम्ही हॉटेलमध्ये खाल्ली असेल मात्र तुम्हाला माहिती आहे का? तुम्ही घरीदेखील हा पदार्थ अगदी सहज बनवू शकता. ही एक स्टार्टर डिश आहे, खास पार्टीसाठी किंवा वीकेंड स्पेशल मेनूसाठी अफगाणी चिकन टिक्का एक उत्तम पर्याय ठरतो. चिकन लव्हर्स असाल तर ही रेसिपी एकदा नक्की ट्राय करा. लहानांपासून मोठ्यांपर्यंत याची चव सर्वांनाच आवडते. चला तर मग नोट करूयात यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

साहित्य बोनलेस चिकन – ५०० ग्रॅम (मध्यम तुकडे करून)

दही – ट कप

फ्रेश क्रीम – ञ कप

लसूण–आले पेस्ट – १ चमचा

काजू पेस्ट – २ चमचे

हिरवी मिरची पेस्ट – १ चमचा


मीठ – चवीनुसार

लिंबाचा रस – १ चमचा

बटर किंवा तेल

चाट मसाला

कांदा आणि लिंबाचे तुकडे





कृती अफगाणी चिकन टिक्का तयार करण्यासाठी सर्वप्रथम एका मोठ्या भांड्यात दही, फ्रेश क्रीम, लसूण–आले पेस्ट, काजू पेस्ट, हिरवी मिरची पेस्ट, लिंबाचा रस आणि मीठ एकत्र करा

या मिश्रणात चिकनचे तुकडे घालून चांगले मिक्स करा

झाकून कमीत कमी ३–४ तास किंवा रात्रभर फ्रिजमध्ये ठेवा. यामुळे चिकन अधिक सॉफ्ट आणि चविष्ट होईल यांनतर गॅसवर एक तवा ठेवा आणि यात बटर घाला

मॅरिनेट केलेले चिकन तुकडे मध्यम आचेवर दोन्ही बाजूंनी छान भाजून घ्या, प्रत्येक बाजूला साधारणतः ५–६ मिनिटं लागतील

चिकन पूर्ण शिजले आहे याची खात्री करून घ्या


तयार अफगाणी चिकन टिक्का वर थोडा चाट मसाला भुरभुरा

झणझणीत हवं असल्यास थोडी लाल तिखट पावडर मिक्स करू शकता

तंदूर किंवा ओव्हनमध्येही हे चिकन ग्रिल करता येते – यासाठी २००ओउ वर २०–२५ मिनिटे शिजवून घ्या

अफगाणी चिकन टिक्का एका प्लेटमध्ये काढा आणि पुदिन्याच्या चटणीसह गरमा गरम खाण्यासाठी सर्व्ह करा

# आरशात स्वत:ला पाहिले, तेव्हा मलाच माझी लाज वाटली ४० टॉफीची दोन पाकिटे एका आठवड्यात संपवायचा विराट; वाचा, त्याने एका रात्रीत कसा बदलला पूर्ण डाएट प्लॅन?






कधी कधी आपण अशा गोष्टी करतो, ज्या आपल्या लिस्टमध्ये कधीच नव्हत्या. एकदा विराट कोहलीबरोबर असेच घडले, ज्यामुळे तो त्याच्या फिटनेसविषयी सीरियस झाला. २०१८ मध्ये अभिनेता आमिर खान, अपारशक्ती खुराना यांच्याबरोबर संवाद साधताना दिग्गज क्रिकेटपटू विराट कोहलीने कबूल केले होते की, २०१२ पर्यंत त्याची शरीररचना खूप वाईट होती.

कोहली सांगतो, २०१२ मध्ये ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर आम्ही परत आलो आणि आशिया कपसाठी बांगलादेशला गेलो तेव्हा पाकिस्तानबरोबरच्या एका सामन्यात मी सर्वोच्च एकदिवसीय १८३ धावा काढल्या होत्या. तो काळ चांगला होता. म्हणून मला वाटले की, जर मी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी केली, तर मला आयपीएलमध्येसुद्धा चांगली कामगिरी करीत वर्चस्व गाजवावे लागले; पण हा एक खेळ आहे. येथे तुमच्या अपेक्षेप्रमाणे घडत नाही. मला अनेकदा अपयश आले. पहिल्या सहा–सात सामन्यांमध्ये मी धावा करू शकलो नाही. मी क्वचितच दोन आकडे रन काढू शकलो. मानसिकदृष्ट्या मी पूर्णपणे खचलो. मी त्यावेळी माझ्या आहार आणि ट्रेनिंगविषयी इतका सीरियस नव्हतो.

मला ट्रेनिंग कशी घ्यायची हेसुद्धा कळत नव्हते. मला वाटले की, प्रॅक्टिस पुरेशी आहे. त्याशिवाय मला जिममध्ये काय करायचे, किती धावायचे, शरीराचे वजन, फॅट्स किती टक्के काहीही माहिती नव्हते. मी खूप गोड खायचो. हॉटेल रूममध्ये मिनी बारमध्ये असलेले ४० टॉफीची दोन पाकिटे एका आठवड्यात संपवायचो. मला खाण्यापिण्याची पद्धत माहीत नव्हती. आयपीएलमधून बाहेर पडणे माझ्यासाठी खूप कठीण होते. मी घरी गेलो, असे विराटने पुढे सांगितले.

पुढे विराट सांगतो, मी अंघोळ करून बाहेर आलो आणि आरशात स्वत:ला पाहिले, तेव्हा मलाच माझी लाज वाटली. आंतरराष्ट्रीय क्रिकेटर असताना एखादी व्यक्ती अशी कशी दिसू शकते? तो दिवस होता टर्निंग पॉइंट. दुसऱ्या दिवसापासून मी सर्व काही पूर्णपणे थांबवले आणि माझा पूर्ण डाएट प्लॅन बदलला. मी दररोज दोन तास जिममध्ये वर्कआउट करू लागलो.

पहिले सहा महिने आव्हानात्मक होते हे सांगताना विराट सांगतो, सुरुवातीचे दिवस खूप कठीण होते. पण, एकदा हे सर्व अमलात आणले की, ते सुरळीत पार पडते.

याविषयी दी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना मानसोपचार तज्ज्ञ, लाइफ कोच डेलना राजेश सांगतात, हे सोपे वाटेल; पण ही मानसिकता तुमचे आयुष्य बदलू शकते. जेव्हा तुम्हाला कळते की, तुम्ही आता सहन करू शकणार नाही, तेव्हा बदल दिसायला सुरुवात होते.

मद्यपान केल्यानंतर दुसऱ्या दिवशी हँगओव्हर होतो? सेलिब्रिटी न्यूट्रिशनिस्टने सांगितले, मद्यपानामुळे झोपेमध्ये कसा व्यत्यय येतो?

त्या सांगतात की, स्वत:शी पूर्णपणे प्रामाणिक राहणे अधिक फायदेशीर ठरते. तुम्ही कोणत्या गोष्टी स्वत:वर काम करण्याला नाही म्हणता हे तुम्ही कोणत्या गोष्टीला हो म्हणता, यापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे. जेव्हा तुमची मूल्ये, ऊर्जा आणि वाढ यांच्याशी कोणत्या गोष्टी जुळत नाहीत, याविषयी तुमच्यामध्ये स्पष्टता येते, तेव्हा तुम्हाला नेमके काय करायचे, हे कळते असे डेलना यांनी अधिक स्पष्ट करताना सांगितले. त्यामुळे जर तुम्हाला अडकलेले, हरवलेले वाटत असेल, तर मी काय करायला पाहिजे, असे विचारू नका. त्याऐवजी विचारा, मी काय करत आहे?, मी कोणत्या गोष्टीसाठी मागे हटण्यास तयार नाही? शेवटी मी काय मिळवण्यास तयार आहे? स्पष्टपणा म्हणजे तुम्ही भविष्यावर नियंत्रण मिळवणे नव्हे. हे तुम्ही स्वत:चे किती ऐकता, यावर अवलंबून आहे आणि एकदा तुम्ही हे केले की, तुम्ही धैर्याने त्याचे अनुकरण करता. ज्या क्षणी तुम्ही जे तुम्ही नाहीत, त्याला नाही म्हणता, त्यावेळी तुम्ही जे आहात, त्यासाठी जागा तयार करता, असे डेलना अधिकत्वाने विशद करून सांगतात.

# देशातील ४५% मुलं ठरत आहेत लठ्ठपणाला बळी, ६ कारणांमुळे लटकतेय पोट

बालपण आणि पौगंडावस्था हा असा काळ असतो जेव्हा मुले उर्जेने भरलेली असतात, त्यांची वाढ जलद होते आणि ते नवीन गोष्टी शिकतात. पण आजच्या धावपळीच्या आणि पडद्यांनी भरलेल्या जगात, अनेक मुले आणि किशोरवयीन मुले लठ्ठपणासारख्या गंभीर समस्येशी झुंजत आहेत. हे फक्त जास्त वजन असण्याची बाब नाही तर त्यामुळे आरोग्याशी संबंधित अनेक समस्या निर्माण होतात.

आजची मुले आणि किशोरवयीन मुले तंत्रज्ञानात खूप पुढे आहेत. ते स्मार्टफोन आणि संगणक खूप वापरतात, परंतु तरीही कधीकधी त्यांना एकटेपणा, चिंता आणि तणावाचा सामना करावा लागतो. यासोबतच, लहान वयात लठ्ठपणाची समस्याही झपाट्याने वाढत आहे, जी चिंतेची बाब आहे. ही समस्या वेळीच ओळखा आणि ती रोखण्यासाठी पावले उचला, जेणेकरून मुलांचे भविष्य निरोगी आणि आनंदी होईल. सध्या या समस्येसाठी काय करता येऊ शकते हे आपण या लेखातून जाणून घेऊया

एका सर्वेक्षणानुसार, भारतातील ४५% मुले जास्त वजनाची आहेत. २८% मुले कोणतीही शारीरिक हालचाल करत नाहीत. ६७% मुले एका तासापेक्षा कमी वेळ बाहेर खेळतात. १९९८ मध्ये दिल्ली आणि चेन्नईमध्ये खूप कमी मुले लठ्ठ होती, पण आता लठ्ठपणा झपाट्याने वाढत आहे आणि तो एक गंभीर आजार होत चालला आहे आणि यावर वेळीच रोख लावण्याची आवश्यकता आहे.


लठ्ठपणाचे काय नुकसान? मुंबईतील कन्सल्टंट बॅरिएट्रिक आणि लॅपरोस्कोपिक सर्जन डॉ. अपर्णा गोविल भास्कर यांच्या मते, लहान वयात लठ्ठपणामुळे शरीर आणि मन दोन्हीवर वाईट परिणाम होतो. यामुळे मुलींमध्ये मासिक पाळी लवकर येऊ शकते. याशिवाय झोपेची समस्या, श्वास घेण्यास त्रास, फॅटी लिव्हर, टाइप २ मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदयरोग, ताणतणाव, चिंता आणि नैराश्य, आत्मविश्वासाचा अभाव आणि वाईट वाटणे इत्यादी समस्या उद्भवत आहेत.

लठ्ठपणाची समस्या का उद्भवते?

लठ्ठपणा फक्त जास्त खाण्याने किंवा आळशीपणाने होत नाही. याची इतर कारणे असू शकतात. हार्मोनल आणि मेंदूचे असंतुलन, कौटुंबिक कारणे, शारीरिक हालचालींचा अभाव, प्रक्रिया केलेले आणि जंक फूड जास्त खाणे, टीव्ही, मोबाईल आणि सोशल मीडियाचा जास्त प्रभाव. बाजारात आणि जाहिरातींमध्ये जंक फूड हे मजेदार आणि आनंददायी पदार्थ म्हणून दाखवले जाते, ज्यामुळे मुलांना ते खाण्याची इच्छा होते.

गंभीर लठ्ठपणा असल्यास काय करावे?

जर एखादे मूल खूप लठ्ठ असेल आणि त्याला इतर आजारही असतील तर फक्त आहार आणि व्यायाम पुरेसा नाही. या परिस्थितीत, डॉक्टरांचा सल्ला घ्या, तुमचा आहार बदला, समुपदेशन घ्या आणि गरज पडल्यास औषधे किंवा शस्त्रक्रिया यासारखे पर्याय स्वीकारले जाऊ शकतात.





संपूर्ण कुटुंबाने यासाठी एकत्र यायला हवे. जेव्हा कुटुंब एकत्रितपणे निरोगी जीवनशैली स्वीकारते तेव्हा मुलेदेखील ती स्वीकारतात आणि यामुळे खाण्यावर व्यवस्थित नियंत्रण येते

शाळांचा सहभागदेखील यामध्ये महत्त्वाचा आहेय शाळांमध्ये जंक फूडवर बंदी घालावी आणि मुलांना खेळण्यासाठी जागा आणि वेळ द्यावा

अभ्यासावर जास्त दबाव आणू नका हे पालकांसाठी आणि शिक्षकांसाठीही जाणून घेणे महत्त्वाचे आहे. पालक आणि शिक्षकांनी मुलांच्या अभ्यासासोबतच त्यांच्या मानसिक आणि शारीरिक विकासाकडे लक्ष दिले पाहिजे

सरकारने कारवाई केली पाहिजे. जंक फूडच्या जाहिराती आणि विक्रीवर, विशेषतः मुलांना जाहिरात केल्या जाणाऱ्यांवर कडक नियम असले पाहिजेत

# कर्नल सोफिया कुरेशी बाबद घृणास्पद वक्तव्य करणाऱ्या विजय शाहवर देशद्रोहाचा खटला दाखल करावा.

आज भारतीय सेनेने पाकिस्तानमध्ये घुसून केलेली आतंकवाद विरोधी कारवाईचे संपूर्ण भारत स्वागत करीत आहे तर दुसरीकडे संपूर्ण भारतीय सेनेच्या कारवाईचे संपूर्ण जग आश्चर्यचकित कौतुक करीत आहे.यामुळे अमेरिका, चीन, तुर्की हादरून गेला आहे.सोबतच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व रक्षा मंत्री राजनाथ सिंग भारतीय सेनेचे मनोबल वाढविण्यासाठी सीमावर्ती भागात थेट भेट देत आहेत. परंतु भारतातील निर्लज्ज नालायक मध्यप्रदेशचे आदिवासी कल्याण मंत्री विजय शहा यांनी वादग्रस्त वक्तव्य करून निर्लज्जतेची हद्द पार केली आहे. देशातील सैनिक असो अथवा सैन्य अधिकारी हा देशाचा कणा आहे. शाहनी लक्षात ठेवले पाहिजे की शेतकरी हा अन्नदाता, कामगार हा शिल्पकार व भारतीय स्थल,जल व वायू सेना ही देशाचा कणा आहे.कारण सेना देशाच्या १४० कोटी जनतेसाठी तहानभूक,उन, पाऊस,वादळ विसरून २४ तास देशाच्या सिमेवर उभा राहुन देशाची सेवा करतो व आपली ढाल बनून रक्षण करतो.माझ्यामते विजय शहाचे घृणास्पद वक्तव्य सन्माननीय कर्नल सोफिया कुरैशी पुरते सिमीत नसुन संपूर्ण भारतीय सैन्यावर घनाघाती प्रहार आहे.त्यामुळे केंद्र सरकारने विजय शाह बद्दल कठोर निर्णय घेऊन आजन्म कारावासाची शिक्षा ठोठावलीच पाहिजे. कारण त्यांचे हे घृणास्पद वक्तव्य देशाच्या १४० कोटी जनतेच्या हृदयात मोठी जखम करून बसली आहे.उच्चपदस्थ राजकीय पुढारी मध्यप्रदेशचे आदिवासी कल्याण मंत्री विजय शाह एका जाहीर कार्यक्रमात म्हणाले की, ज्यांनी आपल्या मुलींचे कुंकू पुसले होते, त्या लोकांना आम्ही त्यांच्याच बहिणीला पाठवून चांगलाच धडा शिकवला. त्यांनी आमच्या हिंदूंना कपडे काढून मारले,तर मोदीजींनी त्यांच्याच समाजातील बहिणीला पाठवले की, जेणेकरून ज्यांनी आमच्या बहिणी विधवा केल्या त्यांना त्यांच्या समाजातील बहीण नग्न करून सोडल.अशाप्रटारचे बेताल वक्तव्य करून विजय शाहनी बेशरमीची हद्द पार केली. असे वक्तव्य करतांना शाहला थोडीशी तरी शर्म वाटायला पाहिजे की भारतातील हिंदू–मुसलमान एक आहे आणि अनंत काळापर्यंत एकत्र राहील हीच भारताची मोठी उपलब्धी आहे.त्यामुळे शाह सारख्या व्यक्तीला देशातील कोणत्याही संविधानिक पदावर रहाण्याचा अधिक नाही. आज विजय शहा यांच्यावर कठोर कारवाई होने अत्यंत गरजेचे आहे.कारण सरकारने जर विजय शहा यांच्यावर कठोर कारवाई केली तर देशातील प्रत्येक तळागाळातील राजकीय पुढारी थोर पुरुषांबद्दल, स्वतंत्र सैनिकांबद्दल किंवा आपल्या पुर्वजांबद्दल बेजबाबदार वक्तव्य करतांना हजार वेळा विचार करेल.त्यामुळे आजच्या परिस्थितीत विजय शहा यांच्यावर कठोर कारवाई होने अत्यंत गरजेचे आहे.कारण त्यांनी देशाच्या रक्षणकर्ता सैन्यावर व सैन्य शक्तीवर मोठा प्रहार करून ताशेरे ओढले आहेत ही बाब देशातील १४० कोटी जनता कदापि सहन करणार नाही. विजय शाहला कल्पना नसेल की की आज भारतात सर्वधर्मसमभाव असल्यामुळे भारत विश्व शांतीचा दुत बनला आहे ही बाब शाहने लक्षात ठेवली पाहिजे. आज भारतात हिंदू, मुस्लिम,शिख,ईसाई, बौद्ध हे संपूर्ण एकोप्याने राहतात आणि जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे की याठिकाणी सर्वच धर्माचे, पंथाचे,जातीचे लोक एकोप्याने राहतात आणि सर्वच आपापल्या संस्कृतीचे पालन करतात.त्यामुळेच संपूर्ण जग भारताकडे चांगल्या दृष्टीने पहातात व विदेशातील लोक भारतात भारतीय संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी येतात.परंतु विजय शाह सारख्या बेताल वक्तव्य करणाऱ्या नालायक लोकांना कोणत्याही राजकीय पक्षात किंवा कोणत्याही पदावर रहाण्याचा अजीबात अधिक नाही असे मला वाटते.२०१३ मध्ये शिवराजसिंह चौहान यांच्या पत्नी साधना यांच्याविषयी वादग्रस्त टिप्पणी केल्याने त्यांना राजीनामा द्यावा लागला होता.यावरून स्पष्ट होते की, विजय शाह यांनी निर्लज्जतेची संपूर्ण हद्दपार केली आहे. त्यामुळे त्यांच्यावर ताबडतोब देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून कठोर शिक्षा ठोठावली पाहिजे. सध्या देशात राजकीय पोळी शेकण्यासाठी राजकीय पुढारी विद्वेषी वक्तव्य देण्याचे प्रकार वाढले आहेत.यावर आवर घालण्यासाठी सुप्रीम कोर्टाने दिनांक २८ एप्रिल २०२३ ला सुप्रीम कोर्टाने आदेश काढला होता की विद्वेषी वक्तव्ये करणारे यांची कोणी तक्रार करेल याची वाट न पाहता राज्यांनी कारवाई करावी. त्या कृतीस विलंब झाला तर तो कोर्टाचा अवमान समजला जाईल असे सुप्रीम कोर्टाने आपल्या आदेशात बजावले आहे.याच आधारे देशाचा, देशाच्या सैन्य शक्तीचा व १४० कोटी जनतेचा अपमान करणाऱ्या राक्षसाला कठोर शिक्षा झालीच पाहिजे.असे जर झाले तर विद्वेषी वक्तव्ये किंवा घृणास्पद किंवा वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्यांच्या जिभेवर आपोआप आवर बसेल.विजय शाह यांनी अशा वेळेस गलिच्छ भाषेत वक्तव्य केले आहे की,आपण आपल्या दुष्मन राष्ट्र पाकिस्तान विरूध्द चांगली लढत देत आहोत आणि त्याला धाराशाही करण्याचे काम कर्नल सोफिया कुरैशी व भारतीय सेनेने केले त्यांच्यापुढे संपूर्ण भारत नतमस्तक आहे.आता घृणास्पद वक्तव्य अंगलट आल्या बरोबर मध्यप्रदेशचे मंत्री विजय शाह म्हणतात की, माझ्या वक्तव्याने कोणाच्या भावना दुखावल्या असतील तर मी दहा वेळा माफी मागायला तयार आहे.कर्नल सोफिया कुरैशी यांच्या बद्दल मला बहिणीपेक्षा अधिक आदय वाटतो. शाहला आता येवढा आदर वाटत आहे तेव्हा बोलतांना थोडीशीही शरम का आली नाही?शाहला लाज वाटायला हवी की सोफिया कुरैशी ही प्रथम भारतीय महिला आहे आणि आता देशाची ढाल आहे.त्यामुळे विजय शाह सारख्या बेजबाबदार वक्तव्य करणाऱ्या गुन्हेगाराला माफी नकोच त्यावर एकच उपाय ती म्हणजे कठोर शिक्षा,असे जर झाले तर देशातील बेजबाबदार वक्तव्य करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांवर आपोआप आवर बसेल यावर महामहीम राष्ट्रपती, सुप्रीम कोर्ट,प्रधानमंत्री, लोकसभा अध्यक्ष, उपराष्ट्रपती यांनी याबाबतीत गांभीर्याने दखल घ्यावी अशी मी या लेखाच्या माध्यमातून सन्माननीय मान्यवरांना विनंती करतो.कारण बेजबाबदार वक्तव्य करणारे राजकीय पुढारी देशासाठी घातक असतात कारण यामुळे समाजात विष पसरत असते असे मला वाटते.सन्माननीय कर्नल सोफिया कुरेशी व संपूर्ण सैन्य शक्तीला माझा कोटी–कोटी सलाम.जय हिंद, जय भारत.

✻✻✻✻✻

लेखक

रमेश कृष्णराव लांजेवार

( स्वतंत्र पत्रकार )

# केज शहरासह परिसरात एका कंटेनर चालकांनी घातला धुमाकूळ १९ जणांना चिरडले तर एका महिलेचा जागीच मृत्यू:८ जणांची प्रकृती गंभीर तर १० जण किरकोळ जखमी

केज हे तालुक्याचे ठिकाण असून या ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय आहे या रुग्णालयात अनेक रुग्ण उपचार घेण्यासाठी येतात व येथे उपजिल्हा रुग्णालयाची भव्य मोठी इमारत आहे या ठिकाणी मोठमोठ्या मशीन देखील उपचारासाठी आहेत परंतु याचा रुग्णांना फायदा होत नाही व तातडीच्या उपचार कामी रुग्णांना लागणारे उपचाराचे साहित्य उपजिल्हा रुग्णालयात उपलब्ध नसल्यामुळे उपस्थित नागरिकांतून नाराजी व्यक्त केली जात होती.





केज/प्रतिनिधी केज शहरासह परिसरात एका कंटेनर चालकांनी घातला धुमाकूळ असून यामध्ये कंटेनर चालकांनी १९ जणांना चिरडले आहे तर एका महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे ८ जणांची प्रकृती गंभीर असून १० जण किरकोळ जखमी झाल्याची घटना घडली आहे. या घटनेची माहिती केज शहरासह परिसरात समजताच सामाजिक, राजकीय क्षेत्रासह विविध क्षेत्रातील पदाधिकारी व नागरिकांनी घटनास्थळावरून तात्काळ उपचारासाठी केजी येथील उपजिल्हा रुग्णालय येथे दाखल केले. याबाबतची प्राथमिक मिळालेली माहिती अशी की, दिनांक १६ मे २०२५ रोजी दुपारी ३-०० वाजण्याच्या सुमारास मांजरसुंबा कडून केजच्या दिशेने एक कंटेनर येत होते. डोणगाव फाटा जवळील टोल नाका परिसरात पासून ते केज शहरासह परिसरामध्ये अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेने चालणाऱ्या नागरिकांना कंटेनर चालकांनी चिरडले आहे. यामध्ये रस्त्याने चालणारे व रोडच्या साईडला उभे असलेल्या मोटरसायकल, चार चाकी गाड्या व काही थ्री सीटर रिक्षांना जोराची धडक देऊन बेभान सुसाट वेगाने कंटेनर धावत होते. यामध्ये केज शहरासह परिसरातील १९ जणांना कंटेनर ने चिरडले असून या घटनेमध्ये मीना प्रवीण घोडके वय३७ वर्षे रा. चिंचोली माळी ता. केज ह.मु.टाकळी ता.केज या केज शहरातील मेन रोडवर लोकरे कॉम्प्लेक्स च्या समोरिल बाजूला रस्त्याने चालत असताना मांजरसुंबा कडून आंबेजोगाई च्या दिशेने जाणाऱ्या कंटेनरने चिरडून मीना घोडके यांचा जागीच मृत्यू झाला आहे. सदर कंटेनर हा मांजरसुंबा कडून आंबेजोगाईच्या दिशेने जात असताना गंगा माऊली शुगर परिसरात, शिक्षक कॉलनी परिसर केज शहरात लोकरे कॉम्प्लेक्स च्या समोर, बस स्टॅन्ड समोर, मंगळवार पेठ कॉर्नर व जय भवानी चौक यासह अनेक ठिकाणी रस्त्याने जाणाऱ्या व रस्त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या मोटरसायकल, थ्री सिटर रिक्षा, चार चाकी वाहने यांना धडक देऊन वाहनाचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. प्राथमिक मिळालेल्या माहितीनुसार केज शहरासह परिसरातील कंटेनर चालकाने विविध ठिकाणी १९ नागरिकांना चिरलेले असून यामध्ये महिला, पुरुष व युवकांचा समावेश आहे. सदर घटनेमध्ये मीना प्रवीण घोडके यांचा जागीच मृत्यू झाला आहे. घटनास्थळावरून नागरिकांनी तात्काळ जखमींना उपचारा कामी उपजिल्हा रुग्णालय केज येथे दाखल केले असता मीना घोडके यांना डॉक्टरने मृत्त घोषित केले यातील ८ गंभीर जखमींना प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय येथे पाठवण्यात आले.१० किरकोळ जखमींना केज येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार करून घरी पाठविण्यात आल्याचे प्राथमिक माहिती मिळाली आहे. सदर कंटेनर हा शहरातून वेगाने धावत होता कंटेनरचा वेग पाहून रस्त्याने चालणारे नागरिक व रस्त्याच्या बाजूला असलेले व्यावसायिक व नागरिक भयभीत झाले होते. सदर कंटेनर केज शहरातून वेगाने आंबेजोगाई च्या दिशेने लोखंडे सावरगाव नजीक एका कॉर्नरला पलटी झाले असून त्या कंटेनरच्या चालकाला युसुफ वडगाव पोलिसांनी ताब्यात घेतल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. सदर घटनेची माहिती शहरात व परिसरात कळताच नागरिकांची उपजिल्हा रुग्णालय येथे गर्दी झाली होती यावेळी जखमींना घटस्थापवरून उपचाराकामी उपजिल्हा रुग्णालय येथे दाखल करण्यासाठी सामाजिक, राजकीय क्षेत्रासह विविध क्षेत्रातील पदाधिकारी, पत्रकार बांधव, युवक, नागरिकांनी मदत केली. जखमींना उपजिल्हा रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल केले असता सुरुवातीला कार्यरत असणाऱ्या डॉक्टर व नर्स,ब्रदरसह कर्मचाऱ्यांची धांदल उडाली परंतु सर्वांच्या मदतीने रुग्णालयातील डॉक्टरांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी जखमींना तात्काळ उपचार करण्यासाठी धावपळ करून सर्वांना उपचार केले.

## नांदूरघाट येथील जीवन प्रगती विद्यालयाचे घवघवीत यश

केज/प्रतिनिधी शालांत प्रमाणपत्र परीक्षा इयत्ता दहावीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून यामध्ये केज तालुक्यातील ग्रामीण भागातील जीवन प्रगती शिक्षण संस्था नांदुरघाट संचलित जीवन प्रगती माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल १०० % (शंभर टक्के) लागला असून छत्रपती संभाजीनगर एसएससी बोर्ड परीक्षेत प्रथम क्रमांक जाधव तनुजा रामहरी १००% दुसरा क्रमांक कटके दीक्षा परमेश्वर ९९.६०% तिसरा क्रमांकम्हेत्रे प्राजक्ता पुरुषोत्तम ९८.६० तर चौथा क्रमांक आंधळकर श्रावणी महादेव ९८.००% पाचवा क्रमांक जाधव सिद्धी बाळासाहेब ९७.२०% ढाकणे पंकजा गोविंद ९७.२०% एवढे गुण मिळवून उत्तीर्ण झाले असल्याने या सर्व यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक आणि अभिनंदन केले जात असुन जीवन प्रगती शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती सावित्रीबाई(अक्का) मोराळे, संस्थेचे आधारस्तंभ मा. राजेशजी मोराळे ,सचिव मा.सौ.माधुरीताई मोराळे मुख्याध्यापक विलास ढाकणे सर यांनी



ही वरील सर्व व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.जीवन प्रगती शिक्षण संस्था ग्रामीण भागामध्ये ज्ञानदानाचे कार्य करत असून संस्थेला यश परंपरेचा एक वारसाच लाभलेला आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच इतर उपक्रमामध्येही विद्यार्थ्यांना सहभागी करून त्यांना गुणवंत बनवण्याचा प्रयत्न असतो संस्थेच्या स्थापनेपासून विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात नावलौकिक केलेले आहे. राजेशजी मोराळे यांचे मार्गदर्शक व सहकार्य विद्यार्थ्यांना व शिक्षकांना सतत प्रेरणादायी असते.

## कोकण रेल्वेचा खडतर प्रवास सुरुच!

मुंबई : उत्तरेकडे जाणाऱ्या मेल एक्सप्रेस गाड्यांतील प्रवास त्रासदायक असतो, असे नेहमी महटले जाते. पण जर कधी कोणी येऊन, कोकण रेल्वेचा प्रवास बघितला तर 'नको रे बाबा असा प्रवास', असे म्हणायची वेळ येईल. इतका खडतर प्रवास कोकण रेल्वेचा आहे. पण हा प्रवास त्रासदायक ठरत असला तरी भाडे कमी असल्यामुळे चाकरमान्यांची याच प्रवासाला अधिक पसंती दिसून येते. मे महिना म्हटला की, झाडून चाकरमानी कोकणात जातात. त्यामुळे सध्या कोकण रेल्वे मार्गावर जाणाऱ्या सर्वच गाडया हाउसफुल असून साधी वेटिंगची तिकीटही मिळेनाशी झाली आहेत. त्यामुळे मिळालेल्या वेटिंग तिकीट रद्द न करता व जनरल तिकीट काढून चाकरमान्यांचा मुंबई ते कोकण खडतर प्रवास सुरू आहे. सध्या मांडवी, कोकणकन्या, तुतारी या एक्सप्रेससह कोकण रेल्वे मार्गावर धावणाऱ्या गाड्यांचे आरक्षण रिग्रेट असे दाखवण्यात येते. त्यामुळे चाकरमान्यांसमोर जनरल तिकीट घेणे हाच पर्याय उरला आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) दादर व ठाणे रेल्वे स्टेशनवर सध्या चाकरमान्यांची मोठी गर्दी दिसून येते. जनरल डब्यात बसायला मिळावे, यासाठी गाडी सुटायच्या अगोदर किमान चार ते पाच तास रांगा लावण्यात येतात. त्यामुळे उशिरा आलेल्या चाकरमानांना जनरल डब्यात उभे राहण्याइतकीही जागा मिळत नाही.

## संभाजीनगर बोर्डात जीवन प्रगती विद्यालयाची विद्यार्थीनी जाधव तनुजा सर्वप्रथम

केज/प्रतिनिधी ग्रामीण भागातील शैक्षणिक दर्जा आता वाढला असुन ग्रामीण भागातील विद्यार्थी शहरातील शाळांना टक्केवारी मध्ये मागे टाकत आहे.याचे जिवंत उदाहरण म्हणजे नुकताच लागलेला इयत्ता दहावीच्या निकालावरून स्पष्ट झाले आहे. याबाबतची अधिक माहिती अशी की सध्या शिक्षणाचा कल शहराकडे वाढत असला तरी ग्रामीण भागातील विद्यार्थीही कुठे कमी नाहीत. हे काल लागलेल्या इयत्ता दहावीच्या निकालावरून दिसून येत आहे. तर जिवनाची प्रगती करायची असेल तर केज तालुक्यातील नांदूरघाट येथील जिवन प्रगती विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश घेवुन आपल्या जीवनाचे सार्थक झाल्याचे पहावयास मिळत आहे. कारण या ठिकाणी विद्यार्थ्यांना होणारे ज्ञानार्जन आणि हे देणारे या शाळेतील सर्व तज्ञ शिक्षक वृंद शाळेची शिस्त यामुळेच असे विद्यार्थी घडत आहेत. काल लागलेल्या इयत्ता दहावीच्या निकालात जिवन प्रगती विद्यालय ची कु. जाधव तनुजा रामहरी हिने पैकीच्या पैकी म्हणजेच १००% गुण प्राप्त करून संभाजीनगर बोर्डातुन जिवन प्रगती विद्यालयशाळेचे विद्यार्थीनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यामुळे जाधव तनुजा रामहरी हिचे सर्वत्र कौतुक होत असुन तिचे अभिनंदन केले जात आहे. तिच्या या यशाबद्दल शाळेच्या वतीने तिचा गौरव करण्यात आला असून तिला पुढील शैक्षणिक आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



## डॉ.विजय बारीकराव बलाढ्ये कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षणरत्न पुरस्काराने सन्मानित

केज/प्रतिनिधी काव्यमित्र संस्था पुणे यांच्यावतीने अयोजित जागतीक मातृ दिन, छत्रपती संभाजी महाराज जयंती, कर्मवीर भावूराव पाटील जयंती व समाजसेवक तथा विचारवंत संजय संघवई यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून समाजात उल्लेखानी कार्य करणार्या विविध क्षेत्रतील व्यक्तीना आदर्श माता, कार्यक्षेत्र उधोजक, कर्मवीर भावुराव पाटील शिक्षणरत्न पुरस्कार आणि राष्ट्रीय सेवागौरव पुरस्कार व जात काही जात नाही...का! आणि आठवणींच्या हिंदोळ्यावर पुस्तकांचे प्रकाशन तारांगण सभागृह पिंपरी चिंचवड सायन्स पार्क या ठिकणी रविवार दिनांक ११ मे २०२५ रोजी सकळी आकरा वाजता देवून सन्मानित करण्यात आले.डॉ विजय बलाढ्ये यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ कवी व साहित्यिक डॉ. सुरेश वाकचौरे, डॉ. अशोक साळुंके, श्रीमंत संभाजीराजे जाधवराव, साहित्यिक तरकसे तशेच काव्यमित्र संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र सगर तसेच उपाध्यक्ष साहित्यिक डॉ. संजय जगताप, सचिव हरिनाथ कांबळे हे उपस्तित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व ग्रंथ पूजन करुण कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. विजय बारीकराव बलाढ्ये यांनी त्यांचे १ ली ते ७ वी शालेय शिक्षण बीड जिल्हयातील अंबेजोगाई तालुक्यातील देवळा या गावामधून पूर्ण केले. त्यांची घरची परिस्थिती जेमतेम/ हलाखीची असल्यामुळे त्यांनी पुढील ८ वी ते १० वी शिक्षण महाराष्ट्र विद्यालय बनसारोळा, ता. केज, जिल्हा बीड येथे वसतिगृहामध्ये राहून पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी त्यांचे पुढील ११ वी ते इ. ड्ल. शिक्षण योगेश्वरी महाविद्यालय अंबेजोगाई येथून प्रथम श्रेणी मधून पूर्ण केले. घरची परिस्थिती नसतानांही आपल्या दोन भावांना घेवून डॉ. विजय औरंगाबाद येथे उच्च शिक्षणासाठी गेले. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातुन च.ड्ल. आणि झह.ऊ उच्च शिक्षण घेतले. ते ड्ढींशेळली विषयामध्ये संशोधन करणारे महाराष्ट्रातील प्रथम संशोधक आहेत आणि ते त्यांच्या देवळा गावामधील पाहिले इ.ड्ल., च.ड्ल. आणि झह.ऊ करणारे एकमेव आहेत...डॉ. विजय यांचा स्वभाव अगदी मनमिळावू, प्रामाणिक, सर्वांना सहकार्य करण्याचा, सर्वांना चांगले मार्गदर्शन करणे, बहुजनांतिल विद्यार्त्यांनां शिक्षणाचें महत्व पटवून देवून त्यांनां सहकार्य करणे इत्यादी. त्यांनी सर्व जाती धर्मांतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शनकरून समाजामध्ये शिक्षणाचे महत्त्व पटवून देवून जनजागरणाचे कार्य करत आहेत. त्यांनी त्यांच्या उच्च शिक्षणानंतर ज्ञानदानाचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मिलिंद महाविद्यालयातून सुरू केले. त्यानंतर अहमदनगर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अँड.सायन्स कॉलेज मध्ये २.५ वर्ष अध्यापणाचे कार्य केले. त्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामधील जैवमाहितिशात्र विभागामध्ये गेले १५ वर्षापासून अध्यापणाचे कार्य करत आहेत. त्यांचा हा शिक्षणाचा केलेला संघर्ष पाहिला असता आणि त्यांची शैक्षणिक, सामाजिक आणि देशप्रेम पाहता काव्यमित्र संस्थेने त्यांनां मानाचा असलेला कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षणरत्न पुरस्कार देऊन सन्मानित केले. काव्यमित्र संस्थेने या वेतीरिक्त समाजात उल्लेखानी कार्य करणार्या विविध क्षेत्रतील व्यक्तीना आदर्श माता, कार्यक्षेत्र उधोजक, कर्मवीर भावुराव पाटील शिक्षणरत्न पुरस्कार आणि राष्ट्रीय सेवागौरव पुरस्कार देवून गौरविन्यात आले. पुस्तक प्रकाशन आणि पुरस्कार वितरण कार्यकर्म अगदी हर्ष उल्हासात पार पाडला. कव्यमित्र संस्थेच्या वतीने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रतिमा कांबळे व कवयित्री लांडगे यांनी केले.



## 'सिंपन प्रतिष्ठान'च्या माध्यमातून परिवर्तन दिन, अभिवादन व सिंपन पुरस्कार सोहळा संपन्न..

कणकवली /प्रतिनिधी :- विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने आणि अमृतवाणींने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली येथील जानवली नदीकाठी १४ मे १९३८ रोजी तत्कालीन दिशाहीन महार समाजाची राजापूर ते गोवा पहिली सामाजिक कोकण पंचमहाल महार परिषद संपन्न झाली होती. सदर परिषदेच्या ऐतिहासिक अनमोल स्मृती जतन करण्यासाठी तथागत गौतम बुद्ध, राजर्षी शाहू महाराज, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीराव फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांच्या परिवर्तनशील विचारांना उजाळा देण्यासाठी १४ मे २०२५ रोजी कणकवली येथे सिंपन प्रतिष्ठानच्या माध्यमातून रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या उपस्थित परिवर्तन दिन, अभिवादन आणि सिंपन पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. 'सिंपन प्रतिष्ठान'चे विद्यमान अध्यक्ष अनिल तांबे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सोहळ्यामध्ये रिपब्लिकन सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते जेष्ठ पत्रकार, संपादक, साहित्यिक उत्तम कांबळे यांना इतिहासाचे गाढे अभ्यासक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कणकवली परिषद अमृत महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. रमाकांत यादव यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सिंपन जीवन गौरव पुरस्काराने तर निवेदक, अभिनेता, व्याख्याते निलेश पवार यांना आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक, प्रकाशक, सिंपन प्रतिष्ठानचे संस्थापक मार्गदर्शक प्रा. विजय जामसंडेकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सिंपन विजयी भव युवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच सामाजिक क्षेत्रात योगदान असलेले सेवानिवृत्त शिक्षक भास्कर धाकू तांबे, जेष्ठ समाजसेवक नाना डामरेकर, निर्भिड पत्रकार विनायक मिठबावकर, सुप्रसिद्ध कवी गायक जनीकुमार कांबळे यांना सिंपन अमृत सन्मान पुरस्काराने तर प्रख्यात रेडिओलाजिस्ट व सोनोलाजिस्ट डॉ. सतिश पवार आणि प्राध्यापक डॉ. सुयश डिकवलकर यांना सिंपन प्रतिष्ठाने सन्मानित करण्यात आले. यावेळी ख्यातनाम चित्रकार नामानंद मोडक, संदिप कदम यांचे कुटुंबीय, जयप्रकाश कदम, अशोक कदम, समाजसेवक ड. वाय. डी. सावंत यांचाही सन्मान करण्यात आला. तर, दिवं. अनिल कृष्णा कदम यांच्या कुटुंबाला आर्थिक मदतीचा हात देण्यात आला. 'सिंपन प्रतिष्ठान'च्या माध्यमातून परिवर्तन दिन, अभिवादन व सिंपन पुरस्कार सोहळा संपन्न..



उत्तम कांबळे यांनी सत्काराला उत्तर देतांना बाबासाहेबांनी पाय ठेवलेल्या लाल मातीतील पुरस्कार मिळाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, सिंपन प्रतिष्ठानने हाती घेतलेल्या कार्याच कौतुक करुन अनमोल मार्गदर्शनही केले. तर प्रमुख पाहुणे रिपब्लिकन सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी आपण आपले कार्य लोकांपर्यंत पोहोचविले पाहिजे. सिंपनच्या कार्याच सिंचन झाले तर अनेक लोक जोडली जातील असा मौलिक सल्ला देऊन, कार्याच कौतुक केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरचिटणीस बाळकृष्ण जाधव, सिंपनच्या कार्याचा व वाटचालीचा मागोवा कोषाध्यक्ष दत्ता पवार, मनोगत अध्यक्ष अनिल तांबे, सुत्रसंचालन राजेश कदम तर आभार प्रदर्शन वैशाली यादव यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सिंपन प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल तांबे, कार्याध्यक्ष डॉ. संदिप कदम, सरचिटणीस बाळकृष्ण जाधव, कोषाध्यक्ष दत्ता पवार, उपाध्यक्ष सत्यविजय तांबे, लक्ष्मण चौकेकर, चिटणीस अजित धामापूरकर, डॉ. श्रीकांत धारपवार, अशोक कांबळे, ड. वर्षा जाधव, दिलीप साळसकर, संजय धारपवार, मिलिंद चिंचवलकर, महेंद्र जाधव, सुनील जाधव, वैशाली यादव यांनी विशेष परिश्रम घेतले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE